# इंद्रायणी को-ऑप. बँक लि. पिंपरी

## * वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना *
## (फक्त सभासदांसाठी)

इंद्रायणी को ऑप बँक लि. पिंपरी या बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविणेत येते की, बँकेची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि. ३०/०९/२०२१ रोजी सकाळी १०.३० वा बँकेचे अध्यक्ष. अॅड. एस.बी.चांडक यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यात आली आहे.

सदर सभा घेणेसंबंधी कोरोना प्रादुर्भावाचा पुन्हा उद्रेक होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने त्यांच्याकडील दि. २५/०२/२०२१ रोजीचे परिपत्रक क्रमांक २४/१३-स जारी केले आहे. त्यानुसार नागरी सहकारी बँकाना **VC/OAVM** या **ONLINE** पद्धतीद्वारा वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करणेबाबत सूचना पारित केल्या आहेत. त्यानुसार **VC/OAVM (Video Conferences/Other Audio Visual Means)** या **Online** पद्धतीद्वारा आपल्या बँकेची सदर वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. तरी त्यानुसार सभासदांनी खालील पद्धतीप्रमाणे सहभागी होणेविषयी विनंती आहे.

सर्व सभासदांना विनंती आहे की, त्यांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, सभासद क्रमांक व स्वत:चा मोबाईल क्रमांक बँकेच्या खाली दिलेल्या **Email-ID** वा **Whats App** मोबाईल क्रमांक यावर नोंद करावी त्यामुळे सभासदांना ऑनलाईन पद्धतीने सभेस सहभागी होता येईल. नोंदणी केलेल्या सभासदांना सभेमध्ये सहभागी होण्याकरिता सभेची लिंक नोंद केलेल्या **Whats App** मोबाईल क्रमांकावर पाठवता येईल. सदरची नोंद करण्याची अंतिम तारीख २७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आहे.

**Email ID : agm@indrayanibank.com** **8956025643**

## * सभेपुढील विषय *

१) मागील दिनांक २१/०३/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाचा अहवाल, वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रमाणीत केलेल्या दि. ३१/०३/२०२१ या वर्षाअखेरचा ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचा विचार करून स्विकृत करणे.

३) आर्थिक सन २०२०-२१ या वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकास संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार मान्यता देणे.

४) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२०-२१ च्या नफा विभागणीस व लाभांशास मान्यता देणे.

५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

६) वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडुन आलेल्या सन २०२०-२१ या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.

७) वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडुन आलेल्या सन २०१९-२० या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोष पूर्तता अहवाल स्विकृत करणे.

८) महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिलेल्या एक रकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत अनुत्पादित तसेच ज्या कर्जांना व्याजात सुट देण्यात आली याची नोंद व मान्यता घेणे.

९) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या अनुत्पादित खात्यापैकी वसुलीची शक्यता नाही अशी खाती वसुलीचे सर्व हक्क अबाधित ठेवून निर्लेखित करणे व अशा खात्यावरील नफा तोटा खात्यास न घेतलेले व्याज निर्लेखित करणे व त्यास मंजुरी देणे.

१०) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी मा. वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.

११) सन २०२२-२३ साठी अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणुक करण्याचे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.

१२) आदर्श पोटनियम ११(ब) नुसार सामान्य **(Ordinary)** सभासदाने त्यांचे शेअर्स रक्कम पूर्ण भरणे बंधनकारक आहे याबाबत त्यावर चर्चा करणे व निर्णय घेणे व त्याचप्रमाणे पोटनियमातील तरतुदीनुसार किमान रुपये १५००/- भाग धारण न केलेल्या सभासदांचे सभासदत्व रद्द करणे बाबत चर्चा करणे व निर्णय घेणे तसेच सभासदांचे क्रियाशील व अक्रियाशील असे वर्गीकरण करणे

१३) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा क्षमापित करणे.

१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
**श्री. सुभाष वेळापुरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : पिंपरी
दिनांक : १६/०९/२०२१

## सुचना :

**१)** इंटरनेट सुविधा उपलब्ध असलेल्या संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोनद्वारे सभासद या वार्षिक सभेत सहभागी होऊ शकतील. या सभेसाठी प्रत्यक्ष उपस्थितीची गरज नाही. **२)** ज्या सभासदांना आपला भाग दाखला मिळाला नसेल त्यांनी त्वरीत घेवून जावा. तसेच बँकेत बचत खाते उघडावे म्हणजे लाभांश ताबडतोब जमा होईल. सन २०१७-१८ या कालावधीत उरलेला लाभांश राखीव निधीस वर्ग करण्यात येणार आहे. **३)** ३१/०३/२०२१ या वर्षाअखेरचा ताळेबंद व नफातोटा पत्रकाची प्रत बँकेच्या नोंदणीकृत कार्यालयांमध्ये तसेच सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे. बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सभासदांना अहवालाची प्रत पाहावयास मिळेल. **४)** गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच ठिकाणी सकाळी ११ वाजता घेण्यात येईल. त्यासाठी गणसंख्येचे बंधन राहणार नाही. **५)** ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील बाबीसंबंधी माहिती विचारावयाची असल्यास त्यांनी दि. २३/०९/२०२१ पुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी विचारणा करावी. **६)** ज्या सभासदांच्या राहण्याच्या ठिकाणाच्या पत्त्यामध्ये बदल झालेला असल्यास त्याची माहिती बँकेस त्वरीत लेखी स्वरुपात कळविण्यात यावी त्यामुळे आपणांस सभेच्या नोटिसा, लाभांश वेळेत मिळू शकेल तसेच सभासदांनी **KYC** च्या कागदपत्रकांची पुर्तता ताबडतोब करावी तसेच आपला मोबाईल नंबर व ई-मेल याची माहिती बँकेत कळवावी. **७)** सन २०२०-२१ चा ताळेबंद व नफा,तोटा पत्रक बँकेच्या **www.indrayanibank.com** या संकेतस्थळावर पाहता येईल. **८)** सभासद दिवंगत झाले असतील तर त्यांच्या वारसदारांनी याबाबत त्वरीत लेखी माहिती योग्य दाखल्यासह बँकेस कळवावे. **९)** काही अनपेक्षित परिस्थितीमुळे जसे तांत्रिक कारणांमुळे सदर सभेचे कामकाज खंडित झाल्यास तांत्रिक त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल. कोणत्याही सभासदास तांत्रिक अडचणींमुळे सभेत सहभागी होता आले नाही तर त्यास बँक जबाबदार राहणार नाही.